# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक २६/०३/२०२६ (गुरूवार )**

---

## संपुर्ण महाराष्ट्र राज्यात रूग्णालयांमध्ये खोटे कागदपत्रे सादर करून बनावट औषधींचा साठा वितरीत करणाऱ्या आंतरराज्यीय आरोपीचा मा उच्च न्यायालयाने जामीन रद्द केला तसेच आरोपीला तात्काळ कोठडीत पाठविण्याचे दिले आदेश

दिनांक २४/०३/२०२६ रोजी  मा. उच्च न्यायालय,खंडपीठ नागपुर यांनी संपुर्ण महाराष्ट्र राज्यात रूग्णालयांमध्ये खोटे कागदपत्रे सादर करून बनावट औषधींचा साठा वितरीत करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीतील आरोपी रॉबीन उर्फ हिमांशु विजयकुमार तनेजा याचा जामीन रद्द करून आरोपीला तात्काळ कोठडीत पाठविण्याचे दिले आदेश

सदर प्रकरणाची सविस्तर हकीकत याप्रमाणे आहे की, फेब्रुवारी सन २०२३ मध्ये नागपुर जिल्हयातील ग्रामीण रूग्णालय कळमेश्वर येथुन औषध निरीक्षक यांनी Ciprofloxacin Recip 500 या औषधीचा नमुना घेवुन प्रयोगशाळेत परिक्षणासाठी पाठविला होता. डिसेंबर २०२३ मध्ये सदर औषध ही बनावट असल्याबाबत चा अहवाल प्रयोगशाळेकडुन प्राप्त झाल्याने त्यांनी या बनावट औषधी बाबत चौकशी केली असता सदर औषध ही मे. जया इंटरप्राईजेस लातुर यांचेकडुन जिल्हा शल्य चिकीत्सक, नागपुर औषध भंडार येथे पुरवठा झाला असुन मे. ॲक्वेन्टीस बायोटेक प्रा.लि. नारपोली, भिवंडी यांचेकडुन मे. जया इंटरप्राईजेस लातुर यांना पुरवठा झाले असल्याचे तसेच मे. ॲक्वेन्टीस बायोटेक प्रा. लि. नारपोली, भिवंडी यांनी सदर बनावट औषध ही मे. काबीज जनरीक हाउस पुनम विहार मीरा रोड ठाणे याचेकडुन खरेदी केल्याचे त्यांचे चौकशीत दिसुन आले. तसेच सदर औषधीचे कार्टन बॉक्स वर नमुद असलेली औषधीची उत्पादक कंपनी M/s Refant Pharma Pvt-Ltd, Plot No. L- 89 MIDC Kerala – 364135 ही सुध्दा अस्तित्वात नसल्याचे त्यांचे चौकशीमध्ये निष्पन्न झाल्याने सदर बनावट औषधीचे उत्पादनाबाबत तपास होणेसाठी त्यांनी पोलीस स्टेशन कळमेश्वर जिल्हा नागपुर ग्रामीण येथे दिलेल्या तक्रारीवरून अपराध क्र. ५७/२०२४ कलम ४२०, ४६७, ४६८, ४७१, २७४, २७५, २७६, १२० (ब) ,३४ भादवि अन्वये नोंद करून तपास करण्यात आला.**सदर गुन्हयाचे गांभिर्य लक्षात घेता मा. श्री हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी सदर गुन्हयाचा तपास श्री अनिल**

**म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा तात्कालीन सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांचे कडे सोपविला.**

**सदर गुन्हयाचे तपास अधिकारी श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा तात्कालीन सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग यांनी गुन्हयाचा सखोल तपास करून सदर गुन्हयात अनेक बाजु उघड केल्या.** तपासा दरम्यान मे. काबीज जनरीक हाउस पुनम विहार मीरा रोड ठाणे चा मालक विजय शैलेन्द्र चौधरी फ्लॅट नं. १९०७ बिल्डींग नं. ०८ पुनम क्लस्टर २ शांतीनगर, मिरा रोड ठाणे याला निष्पन्न करून त्याला अटक केले. साखळी पुरावे जोडत नमुद गुन्हयात रॉबीन उर्फ हिमांशु विजयकुमार तनेजा व रमन विजयकुमार तनेजा या दोन्ही भावांना अटक करण्यात आली होती.पोलीस पथाकाने साखळी पुरावे जोडुन द्वारिका नॅचरल फॉर्म्युलेशन चा मालक अमीतकुमार सुरेशचंद धिमान याला सुध्दा अटक करण्यात केली.नमुद टोळीने महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, उत्तराखंड येथे सुध्दा खोटे कागदपत्रे सादर करून बनावट औषधींचा साठा वितरीत केला होता तसेच या आंतराज्यीय टोळीने सन २०२१ पासुन गुन्हा उघड होई पर्यंत महाराष्ट्रातील विविध जिल्हयातील रूग्णालयांमध्ये बनावट औषधी वितरीत केल्या चे तपासात निष्पन्न झाले होते.

**गुन्हयाचे तपासात आरोपींनी वेगवेगळया नावाने बनावट औषधी तयार करून अस्तीत्वात नसलेल्या कंपन्यांचे प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र तसेच अस्तीत्वात नसलेल्या उत्पादक कंपन्यांच्या नावाने बनावट औषधी तयार करून स्वत:च्या आर्थिक फायदयासाठी शासनाची व जनतेची फसवणुक केली असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे बँक अकाउंटचे स्टेटमेंट वरून अंदाजे १५ ते १६ कोटी रूपयांची उलाढाल केल्याचे दिसुन आले. तपास अधिकारी श्री अनिल म्हस्के यांनी केलेल्या सखोल तपासामुळे महाराष्ट्रातील अशा प्रकारचे १३ गुन्हे उघड झाले. तसेच बाहेर राज्यातील गुन्हे सुध्दा उघड झाले. तपास पथकाने टोळीतील सर्व आरोपींविरूध्द दोषारोपपत्र मा. न्यायालयात दाखल केले आहे. मा. श्री हर्ष ए पोद्दार, पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण यांनी वेळोवेळी तपास पथकाला मार्गदर्शन करून सदर गुन्हयातील आरोपीतांचा जामीन रद्द करण्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला तसेच श्री सागर खर्डे, सहा पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर उपविभाग आणि पोलीस अंमलदार/२२१४ नितेश पुसाम यांनी आरोपींच्या जामीन अर्जा च्या प्रत्येक सुनावलीला हजर राहुन आरोपीतांचा जामीन रद्द करण्यासाठी सरकारी अभियोक्ता यांच्या मार्फतीने मा. न्यायालयापुढे आपली बाजु मांडली.**

**सदर गुन्हयातील आरोपी रॉबीन उर्फ हिमांशु विजयकुमार तनेजा याने केलेल्या जामीन अर्जावरून मा. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश, नागपूर यांनी २८/०५/२०२५ रोजी जामीन मंजुर केला होता. या आदेशाविरूध्द राज्य सरकारतर्फे मा. उच्च न्यायालयात याचीका दाखल केली होती. दिनांक २४/०३/२०२६ रोजी मा. उच्च न्यायालय, नागपुर खंडपीठ यांनी राज्य सरकारी ची याचिका मंजूर करून जिल्हा न्यायालयाचा जामीन आदेश रद्दबातल ठरवला. तसेच आरोपीला फौजदारी प्रक्रिया संहिता २०२३ च्या कलम ४८३(२)**

**अन्वये तात्काळ कोठडीत घेण्याचे निर्देश दिले आहे.मा.न्यायालयाने स्पष्ट केले की बनावट औषधांचा पुरवठा हा केवळ गुन्हा नसून जनआरोग्याशी संबंधित गंभीर प्रश्न आहे. अशा प्रकारच्या गुन्ह्यांवर कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.**

## पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील २ सराईत गुन्हेगारांना एमपीडीए कायदया अंतर्गत केले स्थानबध्द

पोलीस स्टेशन केळवद अंतर्गत राहणारे सराईत गुन्हेगार नामे **१) रोशन देवनाथ बांबल, वय ३९ वर्षे, रा. हत्तीसर्रा, ता. सावनेर आणि २) अरविंद देवानंद बागडे, वय ३७ वर्षे,रा. खापा (नरसाळा),ता सावनेर** यांनी परीसरात गुंडगिरी करून दहशत पसरविली होती. आरोपी रोशन देवनाथ बांबल याच्या विरूध्द रेती चोरी आणि शरिराविरूध्दचे गंभीर गुन्हे नोंद आहे. तसेच आरोपी अरविंद देवानंद बागडे याच्याविरूध्द अवैध दारू आणि शरिराविरूध्दचे गंभीर गुन्हे नोंद आहे. नमुद आरोपी असे गंभीर गुन्हे करण्याच्या सवयीचे आहे. त्यांच्या असमाजिक कृत्याची माहीती पोलीसांना देणाऱ्या लोकांमध्ये ते भय निर्माण करून दहशत पसरवितात. नागपुर ग्रामीण पोलीसांना त्यांचेविरूध्द जेव्हा जेव्हा तक्रारी प्राप्त झाल्या त्या त्या वेळी गंभीर दखल घेवुन त्याचे विरूध्द गुन्हे नोंद केले व त्यांना अटक केले आहे. पोलीसांनी आरोपींचे गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण ठेवण्याकरीता वेळोवेळी त्यांचेवर प्रतिबंधक कार्यवाही सुध्दा केली आहे. तरीसुध्दा दोन्ही आरोपीतांनी आपली गुन्हेगारी गतिविधी निरंतर सुरूच ठेवली.

**आरोपींचे कृत्य समाजिक सुव्यवस्थेला बाधक ठरत असल्याने तसेच आरोपी समाजासाठी धोकादायक ठरत असल्याने मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली केळवद पोलीसांकडुन एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही करण्यात आली. दिनांक २५/०३/२०२६ रोजी मा. जिल्हाधिकारी ,नागपुर यांनी गुन्हेगार नामे १) रोशन देवनाथ बांबल, वय ३९ वर्षे, रा. हत्तीसर्रा, ता. सावनेर आणि २) अरविंद देवानंद बागडे, वय ३७ वर्षे,रा. खापा (नरसाळा),ता सावनेर यांचे विरूध्द स्थानबध्दतेता आदेश काढला असता केळवद पोलीसांनी तात्काळ आरोपीचा शोध घेवुन दोन्ही आरोपीतांना मध्यवर्ती कारागृह नागपुर येथे दाखल केले.**



सराईत गुन्हेगार रोशन देवनाथ बांबळ



सराईत गुन्हेगार अरविंद देवानंद बागडे

# प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्रीसाठी वाहतुक करणाऱ्या आरोपींविरूद्ध गुन्हा नोंद, ११ लाख ४३ हजार ४०० रूपयांचा मुद्देमाल जप्त आरोपी अटक
# पोलीस स्टेशन केळवद यांची कामगिरी

पोलीस स्टेशन केळवद:— दिनांक २५/०३/२०२६ रोजी केळवद पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे खात्रीशिर माहिती मिळाली की, मारूती सुझुकी अर्टीगा वाहनाने अवैधरित्या प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखुची वाहतुक होत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन केळवद हद्दीतील बिहाडा फाटा येथे नाकाबंदी केली. नाकाबंदी दरम्यान वाहन मारूती सुझुकी अर्टीगा क्र. एम एच ४९ सी डी ४४२१ हे वाहन मिळुन आले. वाहन चालक **शेख अजरूद्दीन शेख ऐजाजजुद्दीन, वय ३६ वर्षे, रा हातीमी आपार्टमेंट, दुसरा माळा, शांती नगर,मेन रोड, रतन टॉवर समोर नागपुर** हा मिळुन आला. नमुद वाहनाची पंचासमक्ष तपासणी केली असता वाहनामध्ये प्लास्टीक बोरीमध्ये प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी पंचासमक्ष विविध कंपनीचे प्रतिबंधीत सुगंधित तंबाखु एकुण ११७.२४ किलो किंमती १,१८,४००/— रूपये चारचाकी वाहन किंमती १०,००,०००/—रूपये व एक ॲंड्रॉईड मोबाईल किंमती २५,०००/— रूपये असा एकुण ११,४३,४००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने अवैधरित्या वाहतुक केल्याने आरोपीविरूद्ध पोलीस स्टेशन केळवद येथे भारतीय न्याय संहीता २०२३ चे कलम १२३, २७४, २७५, २२३ सह कलम अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे. **आरोपीला अटक करण्यात आली आहे.**




## दुखापतीच्या गुन्हयातील आरोपीतांना मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

पोलीस स्टेशन काटोल :— फिर्यादी शंकरराव भगवानजी बोंडे, वय ५२ वर्ष, रा. घरतवाडा यांच्या तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन काटोल येथे अप क्र. ४६५/२०१७ कलम ४५२, ३२४, ३४ भांदवि अन्वये गुन्हा नोंद झालेला होता.

**सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, यातील फिर्यादीचे मुलाचे आरोपींसोबत भांडण झाले होते याच कारणावरून फिर्यादी व त्यांचा मुलगा हे आपले घरी हजर असताना आरोपी क्र. १). सुरेश उदयभान धानोरकर, वय ७५ वर्ष, २) मुकेश उर्फ राहुल सुरेश धानोरकर, वय ३० वर्ष, ३). रविंद्र रमेश धानोरकर, वय ३३ वर्ष, ४) अतुल सुरेश धानोरकर, वय ३२ वर्ष, सर्व रा. घरतवाडा यांनी संगनमत करून फिर्यादीचे घराचे अंगणात अनाधिकृत पणे प्रवेश करून फिर्यादी आणि त्याच्या मुलाला बल्ल्याने डोक्यावर मारून जख्मी केले तसेच इतर आरोपीतांनी लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.**

पोहवा ब. नं. ५२६ श्री अनिल जोशी, नेमणुक पोलीस स्टेशन काटोल यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा.

न्यायालयात दाखल केले. **दिनांक २६/०३/२०२६ रोजी मा. प्रथमवर्ग न्यायालय, काटोल श्रीमती स्नेहा आर जाधव यांनी आरोपी क्रमांक १ ते ४ यांना कलम ४५२ भांदवि मध्ये चांगल्या वर्तवणुकीसाठी एक वर्षाकरिता १५०००/— रुपये बंधपत्र, आरोपी क्रमांक १ याला कलम ३२४ भादंवी मध्ये चांगल्या वर्तवणुकीसाठी एक वर्षाकरिता १५,०००/— रुपये बंधपत्र, आणि आरोपी क्रमांक १ ते ४ यांच्याकडून जखमीला २,०००/— रुपये नुकसान भरपाई अशी शिक्षा सुनावली आहे.**

सरकारचे वतीने सरकारी अभियोक्ता श्रीमती मेघा बुरंगे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अंमलदार म्हणुन पोलीस अंमलदार उमेश पातुर्डे, पोलीस स्टेशन काटोल यांनी मदत केली आहे.

## नदीपात्रातुन अवैधरित्या रेतीचा उपसा करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, जेसीबी सह २८ लाख ४० हजारांचा मुद्देमाल जप्त स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी :—** दिनांक २६/०३/२०२६ रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक अवैध धंदयावर कारवाई करणे कामी पोस्टे पारशिवनी हद्दीत पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, पार्डी शिवारात एक इसम कन्हान नदीचे पात्रातून जे.सी.बी चे साहायाने अवैधरित्या विनापरवाना रेतीचा उपसा करीत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी कन्हान नदीचे काठावर सापळा रचुन कारवाई केली असता नदीपात्रात संशयीत जे.सी.बी क्र. एम एच ४० सी क्यु ७८२७ मिळुन आले. तसेच नदी पात्रातील रेतीचा उपसा केलेले दिसुन आले. जेसीबी चालकाला नाव पत्ता विचारला असता, **सरोज दुर्गाप्रसाद समरिते, वय १९ वर्ष, रा. रमगडी, ता. किरणापुर जि. बालाघाट, ह. मु. सिद्धार्थ नगर, कोराडी महादुला नागपूर** अशी माहीती प्राप्त झाली त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याच्या कडे परवाना नव्हता.

पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष १) जे.सी.बी क्र. एम एच—४०/सी क्यु—७८२७ किंमती २८,००,०००/—रूपये आणि उपसा केलेली ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये असा एकुण **२८,४०,०००/—** रूपयांचा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी वाहन नमुद जेसीबी चालक **सरोज दुर्गाप्रसाद समरिते, वय १९ वर्ष, रा. रमगडी, ता. किरणापुर जि. बालाघाट, ह. मु. सिद्धार्थ नगर, कोराडी महादुला नागपूर आणि जेसीबी मालक** यांच्या विरूध्द पोस्टे पारशिवनी येथे कलम ३०३(२), ४९(२) भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) महाराष्ट्र जमिन महसुल संहीता सहकलम ४, २१ खान खनिज अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पारशिवणी पोलीस करीत आहेत.

## प्रतिबंधीत सुगंधित तंबाखुची विक्री करीता साठवणुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद, ६७ हजार ४९० रूपयांचा मूद्देमाल जप्त, रामटेक पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन रामटेक** :— दिनांक २४/०३/२०२६ रोजी रामटेक पोलीस पेट्रोलींग करीत असतांना गुप्त बातमीदारद्वारे माहिती मिळाली की, मौजा नगरधन येथे विनोद उर्फ श्रीपाल नारायण काशीकर, रा. रामटेक वार्ड क्र. ४, नगरधन रामटेक, जि. नागपूर याने त्याचे राहते घरी महाराष्ट्रात प्रतिबंध असलेला सुगंधित तंबाखु विक्री करीता साठा करून ठेवला आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी मौजा नगरधन येथे आरोपी विनोद उर्फ श्रीपाल नारायण काशीकर, रा. रामटेक वार्ड क्र. ४, नगरधन रामटेक, जि. नागपूर याच्या घराची पंचासमक्ष घरझडती घेतली असता महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेला सुंगधीत तंबाखु मिळुन आला. **पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष एकुण ९९.१९ किलो प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु किंमती ६७,४९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

नमुद आरोपीने सदर प्रतिबंधीत सुगंधीत तंबाखु मानवी जिवीतास अपायकारक आहे. तसेच महाराष्ट्र शासनाने त्याचे उप्तादन, विक्री, साठा व वाहतुकीवर प्रतिबंध लावलेला आहे हे माहीती असतांना सुध्दा प्रतिबंधीत अन्नपदार्थाची विक्री करण्याच्या हेतुने साठा केला होता. आरोपी आरोपी विनोद उर्फ श्रीपाल नारायण काशीकर, रा. रामटेक वार्ड क्र. ४, नगरधन रामटेक, जि. नागपूर यांचेविरूद्ध पोस्टे रामटेक येथे अन्न सुरक्षा आणि मानके अधि. २००६ सहकलम १२३, २७४, २७५, २२३ भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

# अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा नोंद, वाहनांसह ३० लाख ४५ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त, उमरेड पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन उमरेड** :— दिनांक २५/०३/२०२६ रोजी उमरेड पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतूक केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीसांनी बायपास चौक,उमरेड येथे नाकाबंदी केली असता टिप्पर क्र एम एच—४०/बी एफ ६५२५ मिळून आल्याने वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. टिप्परचा **चालक नामे शरद कवडुजी सोनवाने, वय ४५ वर्ष, रा. अम्बे नगर, पारडी नागपूर अशी माहीती पोलीसांना प्राप्त झाली.** तसेच पोलीसांनी आरोपी चालकास रेती वाहतूकीच्या परवान्याबाबत विचारपुस केली असता त्याच्याकडे कोणताही परवाना नसल्याबाबत माहिती प्राप्त झाली. **पोलीसांनी पंचासमक्ष १) टिप्पर क्र एम एच—४०/बी एफ ६५२५ किंमती ३०,००,०००/—रूपये २) ०९ ब्रास रेती किंमती ४५,०००/— रूपये असा एकुण ३०,४५,०००/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.**

नमुद आरोपी विरूध्द पोस्टे उमरेड येथे कलम ३०३ (२) भा.न्या.सं सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, सहकलम ४, २१ खाण खनिज अधिनियम, सहकलम ३ सार्वजनिक मालमत्ता नुकसान प्रतिबंधक अधिनियम १९८४, सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधि. १३०/१७७ मोटार वाहन कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०६ गुन्हे नोंद

दिनांक २५/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ९,१९०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०६ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन अरोली** येथे आरोपी नामे जितेंद्र पुरूषोत्तम उरकुडे, वय ४० वर्ष, रा. रेवराल याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन देवलापार** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे ०२ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ गुन्हे तसेच आरोपी कलिदंर माधवराव घोसले, वय २९ वर्ष, रा. उमठा ह. मु. साखरखेडा, ता. नरखेड याचेवर ०१ गुन्हा नोंद, अशा एकुण ०६ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०६ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण ७१ लिटर मोहाफुल गावठी दारू, ४३३० मिली देशी दारू असा एकुण ९१९०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**